Exh 10/D

रे.क.नं. ५८ /२०२६

# पेठवडगाव येथील दिवाणी न्यायाधीशसोा कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात...

सुशांत दत्तात्रय दबडे } वादी

विरूध्द

१) मुख्याधिकारीसोा
वडगाव नगरपरिषद वडगाव
ता. हातकणंगले जि. कोल्हापूर } प्रतिवादी

यातील वादीतर्फे विनंती अर्ज की

Order - Other Side To Say.

Sd/-
I/c C. J. J. D. Peth Vadgaon

१. वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता व कायम मनाई ताकीद होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत दावेची समन्स व नोटीस प्रतिवादींना लागू झाली आहे.

३. प्रस्तुत दावेमध्ये नमूद मिळकतीत वादीचा कायदेशीर व्यवसाय सुरू आहे. दावा मिळकतीचे रितसर भाडे वादी प्रतिवादींना अदा करतात.

४. केवळ नगरपालिकेच्या झालेल्या निवडणुकीमध्ये वादीने सहभाग घेतले कारणाने काही राजकीय लोक यातील प्रतिवादींचेवर दबाव आणत आहेत व त्यापोटी यातील प्रतिवादी हे without following due procedure of law दावा मिळकतीमध्ये येऊन वादीचे कब्जास

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

हरकत करत आहेत. दावेची समन्स प्रतिवादींना पोहोच झालेनंतर दि.२३ मार्च २०२६ रोजी प्रतिवादीतर्फे काही इसम दावा मिळकतीजवळ येऊन पुन्हा त्यांनी वादीचे दावा मिळकतीतील कब्जास हरकत करणेचा प्रयत्न केला व बेकायदेशीरपणे कब्जा घेणेचा प्रयत्न केला. वादींनी कसे बसे करून त्यांना दावा मिळकतीतून हाकलून लावले. प्रतिवादींचे सदरचे कृत्य हे पुर्णपणे बेकायकादेशीर स्वरूपाचे आहेत.

५. प्रस्तुत कामी अद्यापि नि.५ वरील अर्जाची गुणदोषावर उकल होणेची आहे. दावा मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीर व्यवसाय असुन वादीने त्याबाबतची जरूर ती कागदपत्रे कोर्टात जमा केली आहेत परंतु प्रतिवादी हे दांडगाव्याने वादीकडून कब्जा घेणेचा प्रयत्न करीत आहेत. तसे झालेस वादीचे आतोनात व अपरिमित असे नुकसान होणार आहे व दाव्यातील हेतु विफल होणार आहे व वादींच्यावर आणि वादींच्या कामगारांवर उपासमारीची वेळ येणार आहे.

६. प्रतिवादी आजही प्रस्तुतचे काम चालविणेस तयार आहेत.

७. <u>सबब वादीची नम्र विनंती की</u>

अ. प्रस्तुत कामी नि.५ वरील अर्जाचे गुणदोषावर उकल होऊन निर्णय होईपर्यंत यातील प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी दावा मिळकतीतील वादीचे शांततामय कब्जावहिवाटीस हरकत अडथळा करू नये व जैसे थे स्थिती ठेवावी असा प्रतिवादींचे विरूध्द पुढील तारखे अखेरपर्यंत जैसे थे स्थितीचा आदेश होऊन मिळावा.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

येणेप्रमाणे अर्ज असे.

पेठवडगाव

ता.२४.३.२०२६

मे.जा.व्हावे.

ॲफिडेव्हिट

मी वादी सुशांत दत्तात्रय दबडे वय-३४,धंदा-व्यापार, रा.पेठवडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हिट.

~~पेठवडगाव~~ कोल्हापूर

ता.२४.३.२०२६

मे.जा.व्हावे.

ॲफिडेव्हिट करणार यांना मी ओळखतो

~~बी. ए. शेख~~ एम. ए. शेख

ॲडव्होकेट

प्रतिज्ञा

मी वादी सुशांत दत्तात्रय दबडे वय-३४,धंदा-व्यापार, रा.पेठवडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हिटमधील सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.

~~पेठवडगाव~~ कोल्हापूर

ता.२४.३.२०२६

मे.जा.व्हावे.

Solemnly Affirmed before me by Sushant Dattatray Dabade age 34 of Peth Vadgaon Tal-Hatkanangale who is identified by Adv. M. A. Shaikh whom I know personally

Dated :- 24-3-26

24-3-26

Assistant Superintendent